# महाराष्ट्राच्या उद्योग क्षेत्रातील समस्या

**कु.पाटील सुलक्षणा भारत**
संशोधक विद्यार्थीनी, सामाजिक शास्त्रे संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**प्रस्तावना :**

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास शेती व उद्योग या दोन घटकांवर अवलंबून असतो. आजही भारतातील जीडीपीचा दर पाहिला तर असे दिसून येते की, देशाच्या एकूण उत्पन्नात कृषीचा वाटा १५.४%, उद्योगाचा वाटा २३% आहे. तर इतर सेवाक्षेत्राचा वाटा हा ६१.५% आहे. देशातील रोजगाराचे प्रमाण पाहता असे दिसून येते की, शेतीतून निर्माण होणारा रोजगार हा ४४% उद्योगक्षेत्र २५% आणि सेवाक्षेत्रातून निर्माण झालेला रोजगार हा ३१% इतका आहे.[१] भारत आजही विकसीत राष्ट्राच्या यादीत पोहचू शकला यामागचे कारण म्हणजे भारताचा औद्योगिक विकास हा इतर देशाच्या तुलनेत अतिशय कमी आहे. जगातल्या सर्वच विकसीत राष्ट्राची यादी पाहिली तर असे दिसून येईल की, त्यांच्या आर्थिक विकासात उद्योग क्षेत्राची भूमिका जास्त महत्त्वाची होती. तर भारताचा विचार केला असता असे लक्षात येते की, भारतात ब्रिटिशांनी कारखानदारी सुरू केली पण ती काही मुख्य भागापुरतीच मर्यादित होती. महाराष्ट्र, गुजरात व बंगाल सारखी राज्ये व त्यातीलही विशेष म्हणजे पुणे, कलकत्ता, मद्रास, दिल्ली, अहमदाबाद या ठिकाणीच उद्योगाचे केंद्रीकरण झाले होते असे असले तरी महाराष्ट्र औद्योगिक विकासाच्या दृष्टीने क्रमांक एकचे राज्य राहिले आहे.

महाराष्ट्रात ६८ औद्योगिक वसाहती आहेत. त्यामध्ये मराठवाड्यात ११ वसाहती आहेत. महाराष्ट्रात १०४ मोठी औद्योगिक क्षेत्र ५८ विकास केंद्र, ४ केंद्र शासन पुरस्कृत विकास केंद्र व ११५ छोटी औद्योगिक क्षेत्र अधिसूचित केली आहेत. त्यापैकी ८५ मोठी औद्योगिक क्षेत्र ४२ विकास केंद्र, ३ केंद्र शासन पुरस्कृत विकास केंद्र व ७३ कोटी औद्योगिक क्षेत्राची संपादन करून कार्यान्वित करण्यात आली आहे.[२] भारतात एकूण २ कोटीच्या आसपास लघुउद्योग आहेत. भारतातील एकूण निर्यात क्षेत्राच्या अर्धा वाटा लघुउद्योगाचा आहे. शेतीनंतर सर्वात मोठा रोजगार हा लघू उद्योगातून निर्माण होऊ शकतो. लघू उद्योगाचा समावेश अग्रक्रम विभागात करण्यात आलेला आहे. या उद्योगासाठी सवलती निर्माण करणे व त्यातून बेरोजगारी कमी करून, निर्यात क्षेत्रातून परकीय चलन मिळवणे, विभागीय समतोल निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातोय. यासाठी शासन लघू उद्योग संस्था स्थापन करत आहे. यासाठी महाराष्ट्र शासन लघू उद्योग वाढीसाठी सहकारी औद्योगिक वसाहतीची योजना १९५९-६० पासून राबविण्यात आली आहे. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करायची असेल व देशाची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियनची बनवायची असेल तर देशाच्या जीडीपी वाढवला गेला पाहिजे. सध्या देशाच्या जीडीपीमध्ये लघू उद्योगाचा वाटा २९% तर निर्यातीत लघू उद्योगाचा वाटा ४०% आहे. देशात एकूण ६ कोटीपेक्षा जास्त लघूउद्योग आहेत. पैकी २ कोटी लघू उद्योगांची नोंद झाली नाही.[३] एकूण अर्थव्यवस्थेत उद्योगाचा वाटा ४०% आहे. अशा उद्योगक्षेत्राच्या समस्यांचा अभ्यास होणे नक्कीच महत्त्वाचे वाटते. उद्योगक्षेत्राच्या समस्या समजून घेण्याअगोदर उद्योग म्हणजे काय हे समजून घेणे आवश्यक आहे.

**उद्योग म्हणजे काय?**

प्रा.इ.ए.जी. रॉबीन्सन : "विशिष्ट बाजारपेठेसाठी एकसारख्या वस्तू तयार करणाऱ्या उद्योग संस्थांच्या गटाला उद्योग म्हणतात."[४]

**उद्योजकता म्हणजे काय?**

उद्योजकता ही अर्थशास्त्रीय संकल्पना आहे. उद्योजक स्वत:बरोबर इतर व्यक्तीसाठी रोजगार निर्मती करणे, उद्योजक स्वत:च्या कल्पना शक्तीच्या जोरावर विशिष्ट ध्येय समोर ठेवून चिकाटीने, जिद्दीने आणि धाडसाने एक नवीन जबाबदारी स्वीकारणे व त्यातून फायदेशीर आणि उपयुक्त अशी निर्मिती करणे होय. उद्योजकता Entrepreneurship आणि Entrepreneur हे दोन्ही शब्द फ्रेंच भाषेतील आहेत.[५]

**तक्ता क्र.**
**विभागनिहाय सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमाची माहिती**

| विभाग | सुक्ष्म, लघू व मध्यम उपक्रम | प्रमाण | रोजगार लाख | प्रमाण |
|---|---|---|---|---|
| मुंबई | २८,८९५ | १०.४ | ३.६६ | १३.६ |
| कोकण (मुंबई वगळून) | ३४,६१३ | १६.४ | ५.८४ | २१.७ |
| नाशिक | २४,२७९ | ११.५ | २.९७ | ११ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पुणे | ८३,०३३ | ३९.३ | ९.४२ | ३४.९ |
| औरंगाबाद | १४,८५९ | ७.० | १.७० | ६.३ |
| अमरावती | १०,६४२ | ५.० | १.०१ | ३.८ |
| नागपूर | २२,०८२ | १०.४ | २.३५ | ८.७ |
| **एकूण** | **२११४०३** | **१००%** | **२६.९५** | **१००%** |

संदर्भ : एस.एम. कोलते (डिसें. २०१७), महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, पिंपळापुरे ॲण्ड कं.पब्लिशर्स, नागपूर, पृ.१७५

**तक्ता क्र.२**

**महाराष्ट्रातील मोठे आणि लघू उद्योग (२००९)**

| विभाग | मोठे उद्योग | प्रमाण | रोजगार | प्रमाण | लघुउद्योग | प्रमाण | रोजगार | प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मुंबई | २५६ | ९.५९ | १०६२१४ | १६.७ | १२३४१ | ८.१५ | १३०६७२ | ११.०० |
| कोकण (मुंबई वगळून) | १०२१ | ३८.२४ | ९३४६६ | १४.७० | २४७४७ | १६.३४ | २९६७०३ | २४.९७ |
| नाशिक | २८९ | १०.८२ | ७५८६२ | ११.९३ | २२७२७ | १५.०० | १६५९८५ | १३.९७ |
| पुणे | ६६५ | २४.९१ | २३०६८१ | ३६.२९ | ५६६६३ | ३७.४० | ३०१०९८ | २५.३४ |
| औरंगाबाद | १४२ | ५.३२ | ४१९३६ | ६.६० | ११६७२ | ७.७० | १०२०७६ | ८.५९ |
| अमरावती | ४९ | १.८४ | ८१९२ | १.२९ | ७३२८ | ४.८४ | ५५४४३ | ४.६७ |
| नागपूर | २४८ | ९.२९ | ७९२८६ | १२.४७ | १६०१७ | १०.५७ | १३६२०४ | ११.४६ |
| महाराष्ट्र | २६७० | १००% | ६३५६३७ | १००% | १५१४९५ | १००% | ११८८१८१ | १००% |

संदर्भ : महाराष्ट्र आर्थिक सर्वेक्षण २००९-१०

**संशोधनाची उद्दिष्टे**

१) महाराष्ट्रातल्या एकूण उद्योगाच्या स्थितीबाबत माहिती घेणे.

२) महाराष्ट्रातल्या उद्योग क्षेत्रात असणाऱ्या समस्या समजून घेणे.

**गृहितक**

महाराष्ट्र औद्योगिक विकासातले अग्रणी राज्य असूनही उद्योगाचे केंद्रीकरण विशिष्ट भागातच झाले असून इतर भागातल्या उद्योगांसमोर अनेक समस्या आढळून येतात.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधन विषय हाताळण्यासाठी सामाजिक संशोधनातील द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून यात संदर्भ ग्रंथ, मासिक, लेख, संशोधन प्रबंध, शासकीय अहवाल इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

**महाराष्ट्रातल्या लघु उद्योगाच्या समस्या**

महाराष्ट्रासारख्या औद्योगिकदृष्ट्या विकसीत राष्ट्रातही उद्योग व उद्योजकांना काही समस्यांना सामोरे जावे लागत आहे. उद्योग व उद्योजकांना भेडसावणाऱ्या समस्यांची चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल.

१) उद्योग क्षेत्रातील सर्वांत मोठी समस्या म्हणजे उद्योगासाठी लागणारा कच्चा माल मोठ्या प्रमाणात योग्य दरात, योग्य वेळी अखंडीतपणे मिळवण्यात अडचणी येतात.

२) लघू उद्योग, कुटीर उद्योग आणि काही मोठ्या उद्योगात उत्पादनाचे जुने तंत्र वापरले जाते. त्यामुळे उत्पादनात घट होते. असे उद्योग इतर उद्योगाच्या स्पर्धेत टिकू शकत नाहीत.

३) उद्योग चालवण्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री यासाठी लागणारी गुंतवणूक मोठी असते. सर्वाधिक भांडवल गुंतवणूक ही यंत्रसामुग्री साठीच केली जाते. त्यामुळे पर्याप्त भांडवल नसेल तर यंत्रसामुग्री संबंधीचा खर्च उद्योजकांना परवडत नाही. यामुळे उद्योग चालवण्यात बऱ्याच अडचणी येतात.

४) उद्योजकांसमोर आणखी एक सर्वांत मोठी समस्या म्हणजे उत्पादीत मालाला योग्य बाजारपेठ आणि योग्य किंमत मिळवण्याची वस्तूला योग्य भाव व बाजारपेठ मिळाली नाही तर उद्योग यशस्वी होऊ शकत नाहीत. याचा दुष्परिणाम उद्योगातील रोजंदार व उद्योजक यांच्यावर होतो.

५) उद्योगांना एकमेकांशी कराव्या लागणाऱ्या स्पर्धेत काही उद्योग टिकू शकत नाहीत. विशेषत: मोठ्या उद्योगाशी करावी लागणाऱ्या स्पर्धेत लघू व कुटीर उद्योग टिकू शकत नाहीत.

६) उद्योग म्हटली की कोणताही एक उद्योग तो एकटा नसतो. एका उत्पादक घटकाशी इतर उद्योग नेहमीच स्पर्धा करतात त्यात इतर उद्योगाच्या गुणवत्तेच्या तुलनेत उतरणे काही उद्योगांना शक्य होत नाही.

७) उद्योग क्षेत्रात इतर उद्योगाशी संबंधीत कोणत्या घटकाशी संघटन नसते. कारण उद्योग हे बहुतांशी वैयक्तिक मालकीचे असतात. त्यामुळे कामगारांचा पगार किंवा वस्तूला किंमत मिळवणे किंवा यासारख्या अनेक समस्यांवर उपाय करणे शक्य होत नाही.

८) उद्योगातील उत्पादनानुसार त्याला वेगवेगळे शासकीय कर लादले जातात आणि नाही चुकवले तर दंड भरावा लागतो. यामुळे उद्योगाचे नियोजन बिघडून अनेक समस्या निर्माण होतात.

९) उद्योजक व कामगार दोन्ही प्रशिक्षित असतील तर उत्कृष्ट उत्पादन तयार होते पण या गोष्टी बऱ्याच उद्योगाला अयशस्वी होण्यास कारणीभूत ठरतात. कारण कामगार व उद्योजकांना प्रशिक्षण देण्यासाठी कसलीही व्यवस्था नसते.

१०) वस्तू निर्मितीसाठी कच्चा माल मिळविणे व वस्तू विक्रीसाठी योग्य बाजारपेठापर्यंत पोहचवला जाणे आवश्यक असते. पण वाहतूक व दळणवळणाच्या अभावी आणि वाहतूक व दळणवळणावर होणारा अवाजवी खर्च यातून अनेक समस्या निर्माण होतात.

११) वस्तूच्या मागणीनुसार उत्पादन घटकात बदल करणे आवश्यक असते. तीच पांरपारिक पद्धत अवलंबल्यास उत्पादनात घट होते. नियमीत पण बाजारपेठेच्या मागणी संदर्भात संशोधन होणे आवश्यक असते. पण उद्योग क्षेत्राच्या बाबतीत हे फार कमी प्रमाणात होते. त्यामुळेसमस्या निर्माण होऊ शकतात.

१२) उद्योग क्षेत्र विशेषत: लघू आणि कुटीर उद्योगात उद्योग क्षमतेचा पुरेपूर वापर होत नाही. कुशल कामगार, कच्च्या मालाचा अपुरेपणा, भांडवल इ. कारणांमुळे उद्योग चालवण्यात अडचणी येतात.

१३) उद्योगाच्या आधुनिकीकरणाबबत विशेष योजना शासन व उद्योजकाकडून राबवल्या जात नाहीत. त्यामुळे सुध्दा उद्योगात तेच ते पणा व उदासीनता निर्माण होते.

१४) राज्यातले बरेचसे उद्योग आजारी आहेत. त्यामागचे महत्त्वाचे कारण म्हणजे उद्योगाला आवश्यक मूलभूत गोष्टी त्यांच्यापर्यंत अजूनही पोहचल्या नाहीत. वीज, पाणी, कच्चा माल, भांडवल इ. योग्य नियोजनाअभावी अनेक समस्या निर्माण होतात.

**निष्कर्ष**

१) उद्योग चालवणे किंवा कोणतेही काम करताना अडचणी समस्या या उद्‌भवणारच पण त्यावर नियंत्रण ठेवता आले नाही की समस्या गंभीर बनते.

२) उद्योग क्षेत्राचा विस्तार होणे आवश्यक आहे. त्यासाठी उद्योगापुढे असलेल्या समस्या या औद्योगिक संघटना, स्वत: उद्योजकांनी प्रयत्न करून, शासनाच्या मदतीने सोडवले पाहिजे.

३) शासन उद्योगाच्या संदर्भात पंचवार्षिक योजना व वेगवेगळ्या नियोजन आयोगाच्या माध्यमातून प्रश्न सोडवण्यास प्रयत्नशील आहे. वेगवेगळ्या योजना राबवल्या जातात पण कित्येक योजना या प्रत्यक्ष लाभार्थ्यापर्यंत पोहचत नाहीत त्यामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.

४) उद्योजकांनी स्वत:च्या समस्या सोडविण्यासाठी शासनाच्या वेगवेगळ्या योजनांचा लाभ घेणे आवश्यक असते. यासाठी स्वत: उद्योजकांनी प्रयत्न केले पाहिजे.

५) उद्योगातून रोजगार निर्मिती होऊन बेरोजगारीची समस्या कमी होऊ शकते पण स्वत: उद्योग क्षेत्रच समस्येत असल्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न गंभीर होताना दिसत आहे.

**संदर्भ**

१) www.wikipedia.com
२) डॉ.जयंत जोशी, व्यावसायिक उद्योजकता, पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर
३) डॉ.साबळे पाटील, भारतीय अर्थव्यवस्था, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद
४) डॉ.डी.एन. भामरे (२०१६), भारतीय अर्थव्यवस्था, पिंपळापुरे पब्लिकेशन, नागपूर
५) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ वार्षिक अहवाल २०११-१२ पृ.५
६) मराठवाडा २००१ खंड २ संयोजन समिती विकास भवन, औरंगाबाद, पृ.१२६
७) डॉ.डी.जी. गिरधारी (२००३), उद्योजकतेची मूलतत्त्वे, पिंपळापुरे पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद,पृ.१